महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११३ वे | दिनांक : १८/०४/२०२६ | वार : शनिवार

## आ. गायकवाड आणि माजी आ. विजय शिंदेंना तडीपार करा : वंचितची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**बुलढाणा** : जिल्ह्यातील दोन बड्या नेत्यांमध्ये सुरू असलेल्या अत्यंत खालच्या पातळीवरील आरोप-प्रत्यारोपामुळे जिल्ह्याची सामाजिक आणि राजकीय प्रतिमा डागाळली जात आहे. या पार्श्वभूमीवर, शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे या दोघांनाही जिल्ह्यातून तडीपार करावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. या मागणीसाठी वंचितच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जोरदार घोषणाबाजी केल्याने जिल्हा प्रशासनासह राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून आमदार संजय गायकवाड आणि विजयराज शिंदे यांच्यात शाब्दिक युद्ध पेटले आहे. मात्र, हा वाद आता राजकीय धोरणांवरून न राहता वैयक्तिक आणि अतिशय गंभीर आरोपांपर्यंत पोहोचला आहे. यामुळे जिल्ह्यात विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये तणावाचे वातावरण असून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. "बुलढाणा ही राजमाता जिजाऊंची जन्मभूमी म्हणून ओळखली जाते, मात्र या नेत्यांच्या 'वैचारिक प्रदूषणामुळे' जिल्ह्याची बदनामी होत आहे," अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीने मांडली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. "सामान्य गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करणारे प्रशासन, जिल्ह्याची शांतता भंग करणाऱ्या या बड्या नेत्यांवर मेहेरबानी का करत आहे?" असा सवाल यावेळी विचारण्यात आला. जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या दोन्ही नेत्यांना तातडीने जिल्ह्यातून बाहेर काढावे (तडीपार करावे), असे निवेदन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

आमदार संजय गायकवाड आणि भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे या दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर केलेले आरोप हे केवळ राजकीय नसून ते गुन्हेगारी स्वरूपाचे आहेत. विजयराज शिंदे यांनी अनेक मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. इतकेच नव्हे तर एका अल्पवयीन मुलीचा अवैध गर्भपातही केल्याचा खळबळजनक आरोप संजय गायकवाड यांनी केला असून, आपल्याकडे शासकीय अहवालासह सर्व पुरावे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

संजय गायकवाड यांनी केलेले आरोप विजयराज शिंदे यांनी फेटाळून लावलेत. "आमदारांनी माझाच नाही तर आदिवासी आणि मागासवर्गीय महिलांचा अवमान केला आहे," असे म्हटले आहे. याप्रकरणी गायकवाड यांनी माफी न मागितल्यास १०० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकण्याचा इशाराही शिंदे यांनी दिला आहे.

## मुलगी मोठी होतेय म्हणून काहींचा जळफळाट : युनूस शेख



**मुंबई** : ठाणे महानगरपालिकेच्या 'एमआयएम' पक्षाच्या माजी नगरसेविका सहर शेख यांच्या कथित बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले आहे. गेल्या दोन दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेले सहर शेख यांचे वडील युनुस शेख शुक्रवारी अचानक मुंब्रा पोलिस ठाण्यात हजर झाले. यावेळी त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावत, "दोन दिवसांत दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, विरोधकांना करारा जवाब मिळेल," असा आक्रमक पवित्रा घेतला आहे.

सहर शेख यांनी बनावट जात प्रमाणपत्र सादर करून महापालिका निवडणूक लढवल्याची तक्रार सिद्दिकी अहमद यांनी दाखल केली आहे. तक्रारदाराच्या दाव्यानुसार, युनूस शेख हे मूळचे उत्तर प्रदेशातील गाझियाबादचे रहिवासी असून ते महाराष्ट्रात स्थलांतरित झाले आहेत. स्थलांतरित नागरिकांसाठी 'नमुना १०' लागू असताना, युनूस शेख यांनी 'नमुना ८' चा वापर करून प्रशासनाची दिशाभूल केल्याचा आरोप आहे. याच कागदपत्रांच्या आधारे मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्र मिळवून सहर शेख यांनी ठाणे महापालिकेत विजय मिळवल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

मुंब्रा पोलिस ठाण्यात सुमारे २० मिनिटे पोलिसांशी चर्चा केल्यानंतर बाहेर पडलेले युनूस शेख पत्रकारांशी बोलताना प्रचंड संतापलेले दिसले. त्यांनी या प्रकरणाला निव्वळ 'राजकीय स्टंट' संबोधले आहे. "दोन दिवसांत आम्ही आमची भूमिका कायदेशीररीत्या स्पष्ट करू. जे काही आरोप होत आहेत, ते पूर्णपणे चुकीचे आहेत. माझी मुलगी राजकारणात मोठी होतेय, हे पाहून अनेकांना जळण होत आहे, त्यातूनच हा त्रास दिला जात आहे," असे शेख यांनी यावेळी स्पष्ट केले.

हे प्रकरण समोर आल्यापासून सहर शेख या नॉट रिचेबल आहेत. मात्र, गुरुवारी त्या चक्क मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर क्रिकेटचा आनंद घेताना दिसल्या. १६ एप्रिल रोजी मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्स यांच्यात झालेल्या सामन्याचा एक व्हिडिओ त्यांनी स्वतः आपल्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.

यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली असून, "जर त्या 'नॉट रिचेबल' होत्या, तर मग स्टेडियमवर कशा दिसल्या?" असा प्रश्न विचारला जात आहे. यावर त्यांचे वडील युनूस शेख यांनी आपली भूमिका मांडली. "तिने मॅच पाहायला जाण्यात काय चुकीचे आहे? ती काय पळून गेलेली नाही," असे म्हणत त्यांनी आपल्या मुलीची पाठराखण केली.

दरम्यान, सहर शेख यांनी आयपीएल सामना पाहयला गेल्यानंतर स्टेडियमच्या गॅलरीतील व्हिडीओ पोस्ट केला आहे. या स्टोरीमध्ये त्यांनी सामन्याच्या व्हिडिओसह गेम ओव्हर असे देखील लिहिले. तसेच तूने ना जाना तेरे जाने से क्या क्या हुआ, कितनी कहानी बनी कितना तमाशा हुआ..जाने तू कैसी होगी..असे गाणेही स्टोरीला लावलेले आहे. स्टोरीला दिलेले कॅप्शन आणि लावलेले गाणे यावरून सहर शेख यांनी सगळ्या विरोधकांना पुन्हा डिवचल्याचे बोलले जात आहे.

## शरद पवारांना मोठा राजकीय धक्का? तीन दिवसांत मोठा निर्णय



**मुंबई** : अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांत मोठी राजकीय घडामोड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडीचा परिणाम थेट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि राज्यातील राजकारणावर होऊ शकतो. पुढील तीन दिवसांत एक मोठा नेता शरद पवार यांची साथ सोडू शकतो, अशी चर्चा सध्या जोर धरत आहे. त्यामुळे या संभाव्य निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणूक आमदार शिवाजीराव कार्डिले यांच्या निधनामुळे लागली आहे. या निवडणुकीसाठी भाजपने त्यांच्या सुपुत्र अक्षय कार्डिले यांना उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून प्राजक्त तनपुरे हे उमेदवार म्हणून चर्चेत होते. मात्र, त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी गोविंद मोकाटे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे.

प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी न भरण्यामागे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि रवींद्र चव्हाण यांनी तनपुरे यांच्याशी चर्चा केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर तनपुरे यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या भेटीमुळेच त्यांनी पाऊल मागे घेतले का, असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, प्राजक्त तनपुरे 20 एप्रिल रोजी आपली भूमिका जाहीर करणार असल्याचे सांगितले जात आहे. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन ते अंतिम निर्णय जाहीर करतील. काही कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्यामुळे हा मेळावा घेतला जाणार असल्याचे तनपुरे यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, ते भाजपमध्ये प्रवेश करणार का किंवा अक्षय कार्डिले यांना थेट पाठिंबा देणार का, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

प्राजक्त तनपुरे यांचा राहुरी तालुक्यात मोठा प्रभाव आहे. नगरपालिका, बाजार समिती आणि साखर कारखाना यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवर त्यांचे वर्चस्व असल्याचे मानले जाते. तनपुरे कुटुंबाला स्थानिक पातळीवर मोठा मान-सन्मान आहे. त्यामुळे त्यांनी जर भाजपमध्ये प्रवेश केला, तर भाजपची ताकद या भागात लक्षणीय वाढू शकते, अशी चर्चा आहे.

या पार्श्वभूमीवर माजी खासदार सुजय विखे पाटील यांनीही तनपुरे यांच्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. याआधी त्यांनी तनपुरेंची खिल्ली उडवली होती, मात्र आता त्यांची स्तुती करताना दिसत आहेत. एकूणच, पुढील काही दिवसांत प्राजक्त तनपुरे कोणता निर्णय घेतात, यावर राहुरी पोटनिवडणुकीचे आणि राज्याच्या राजकारणाचे चित्र मोठ्या प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ एप्रिल २०२६


## भारतीय संविधान हे सर्व विकासाची गुरूकिल्ली आहे - मिर्झा अब्दुल कयुम नदवी



**छत्रपती संभाजीनगर :** हजारो जाती, शेकडो भाषा, कितीतरी प्रांत राज्य, केंद्रशासित प्रदेश, कित्येक धर्म रूढी परंपरा एवढे टोकांचे विरोधाभास व वैविधता असतांना सर्वांना एकसंघ बांधण्याचे कार्य केवळ संविधानानेच केले आहे, भारतीय संविधान सर्व समस्या सोडवून सर्वांचा विकास साधण्याची गुरूकिल्ली आहे.- असे प्रतिपादन रिड एन्ड लिड फाऊंडेशनचे अध्यक्ष मिर्झा अब्दुल कयुम नदवी यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय संविधान मूल्य अधिकार आणि कर्तव्य विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बोलतांना मिर्झा कयुम यांनी देशातील कोणत्याही कठीण प्रश्नाची उकल असो, की जाती धर्माचे भेसूर प्रश्न असो, राज्य प्रांत वाद असो कोणत्याही गहण समस्या त्यांचे निराकरण व समजातील सर्वात शेवटच्या घटकांना, अल्पसंख्याकांना न्याय देणयाचे, विकासाची हमी देण्याचे कार्य भारतीय संविधानामुळेच पूर्णत्वाला जाते . म्हणूनच जगात भारत व भारतीय संविधान हे एक आश्चर्य असल्याचे बोलले जाते असे नदवी म्हणाले.यावेळी डॉ. अशोक केवटे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर व्ही मस्के हे होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा नवनाथ गोरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. रामेश्वर वर्शिल यांनी व आभार उपप्राचार्य प्रा.एन.एम करडे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे, डॉ. एस.पी. बुधवंत, डॉ. प्रेमराज वाघमारे, डॉ. संजय खरात, डॉ. गौतम घाडगे, डॉ. सुनील सोनवणे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले जयंतीनिमित्त चर्चासत्र व पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक समता, मानवता आणि सत्यशोधक विचारांच्या परंपरेचा गौरव करणारा ऐतिहासिक उपक्रम म्हणून महाराष्ट्रात प्रथमच डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले जयंती उत्सव तसेच डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येत आहे.महात्मा जोतीराव फुले यांचे दत्तक पुत्र डॉ. यशवंत जोतीराव फुले यांनी आपल्या वडिलांच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळीचा वारसा समर्थपणे पुढे नेला. आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करत त्यांनी प्लेगसारख्या भीषण साथीच्या काळात सावित्रीमाई फुले यांच्या प्रेरणेने दवाखाना सुरू करून हजारो बहुजन, शूद्र-अतिशूद्र बांधवांचे प्राण वाचवले. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, त्याग आणि समतेची मूल्ये अधोरेखित होतात.याच कार्यप्रेरणेने वैद्यकीय क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या डॉक्टरांना "डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. समाजसेवेला प्राधान्य देणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांसाठी हा पुरस्कार प्रेरणादायी ठरणार आहे.दरम्यान, लेखक राजाराम सूर्यवंशी यांनी महाराष्ट्रात प्रथमच डॉ. यशवंत फुले यांचे चरित्र लेखन करून त्यांच्या कार्याचा व सत्यशोधक चळवळीतल्या योगदानाचा उजाळा दिला आहे. या ग्रंथावर तसेच डॉ. फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल चर्चा या कार्यक्रमात आयोजित करण्यात आली आहे.फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते, अभ्यासक, विचारवंत तसेच समाजातील सर्व घटकांनी या ऐतिहासिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.सदर समारंभ १८ एप्रिल २०२६ (शनिवार) रोजी सायंकाळी ६.३० वाजता, गांधी भवन (शासकीय ग्रंथालयाशेजारी) येथे आयोजित करण्यात आला आहे.भारतीय पिछडा शोषित संघटन, नवी दिल्ली आणि सत्यशोधक शिक्षक सभा, महाराष्ट्र या संघटनेचे कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास प्रा. सुदाम चिंचाणे, प्रभाकर गायकवाड, डॉ. कालिदास भांगे, जनार्दन कापुरे, डॉ. देवराज दराडे, वसंत हारकळ आदी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## जवळगा बेटची प्राची मुकडे दहावी सी.बी.एस.ई. परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुका उमरगा, जिल्हा धाराशिव येथील जवळगा बेट गावातील प्राची मुकडे हिने दहावीच्या CBSE परीक्षेत ९९.२०% (४९६/५००) गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे गावकऱ्यांच्या वतीने तिचा व तिच्या वडिलांचा प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.प्राचीच्या यशामागे तिची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. तसेच तिच्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार व प्रोत्साहनही तिच्या यशाला कारणीभूत ठरले आहे. ग्रामीण भागातून येऊनही तिने आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केल्याने ती इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे. प्राची मुकडे ही माजी सरपंच रामानंद मुकडे यांची सुपुत्री असून, तीच्या यशामुळे लोटस पोदार लर्न स्कूलच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचीही प्रचिती आली आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. सत्काराला उत्तर देताना प्राची मुकडे हिने आपण ग्रामीण भागातील असूनही मोठे यश संपादन करता येते, यावर विश्वास ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. कोणतीही न्यूनगंडाची भावना मनात बाळगता कामा नये, असे ती म्हणाली. जिद्द, चिकाटी, नियमित अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर उज्ज्वल यश संपादन करता येते, असा प्रेरणादायी संदेश तिने दिला.

## मंचक देशमुख यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** व्हॉइस ऑफ मीडिया शाखा परभणीचे नूतन कार्यकारणी आज बुधवार रोजी परभणी या ठिकाणी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.उपाध्यक्ष परभणी जिल्हा मंचक देशमुख यांची निवड करण्यात आली. यावेळी नियुक्तीपत्र देताना कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य विजय चोरडिया, राज्यसह सरचिटणीस सुरज कदम , राज्य संघटक गजानन देशमुख,( टी.व्ही 9) मराठी, मराठवाडा संघटक विशाल माने आय,बी,एन( लोकमत) जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण, मराठवाडा संघटक सुरेश जेपनगिरे, जिल्हाध्यक्ष ग्रामीण बाळासाहेब काळे सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. अनेक मित्र परिवारांना शुभेच्छा दिल्या आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ एप्रिल २०२६


## जयभवानी महाविद्यालयात सलग १८ तास वाचन उपक्रम



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सलग १८ तास वाचन उपक्रमाचे ग्रंथालय विभागाच्या वत्तीने आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या वाचन उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके, कादंबऱ्या, चरित्रे तसेच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त साहित्याचे सलग १८ तास वाचन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरला. या उपक्रमाचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देत नियमित वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी आपल्या मनोगतात वाचनामुळे ज्ञानवृद्धी होत असून व्यक्तिमत्व विकासास मदत होते. असे सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही असे उपक्रम राबविण्याचा मानस महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केला आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले.

या उपक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थ्यांनी तसेच वाचकांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या या सलग १८ तास वाचन उपक्रमाचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

## स्मार्ट कार्ड नसले तरी सवलत सुरूच; महिलांसह सर्वांना लाभ !



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** राज्य परिवहन महामंडळाच्या सवलतीच्या प्रवास योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड नसलेल्या पात्र लाभार्थीनाही सवलतीचा प्रवास सुरूच असल्याचे स्पष्टीकरण जिंतूर आगारप्रमुख आनंद चव्हाण यांनी दिले आहे. तसेच प्रवाशांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. राज्य परिवहन महामंडळामार्फत ६५ वर्षे व ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी तसेच महिलांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते. महिलांसाठी अर्ध्या तिकिटदरात (५०% सवलत) प्रवासाची योजना सुरू असून, मोठ्या प्रमाणात महिला प्रवासी या योजनेचा लाभ घेत आहेत.या योजनेअंतर्गत स्मार्ट कार्ड वितरण प्रक्रिया सध्या सुरू असून अनेक प्रवाशांकडे अद्याप स्मार्ट कार्ड उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे स्मार्ट कार्ड नसल्यास सवलत मिळणार नाही, अशी चुकीची समजूत काही ठिकाणी पसरली आहे. याबाबत आगारप्रमुख यांनी स्पष्ट केले की, ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड उपलब्ध नाही अशा पात्र लाभार्थी नाही नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात आहे आणि पुढेही दिला जाणार आहे. सवलतीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असून, पात्र प्रवाशांनी लवकरात लवकर स्मार्ट कार्ड काढून घ्यावे, असेही आव्हान त्यांनी केले.

## प्रा. गिरीश काळे वर्धा लिखित साक्षरता गीत सर्वत्र प्रसारीत



**जालना ता. (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** कनिष्ठ महाविद्यलयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे वर्धा जिल्हाध्यक्ष आणि डॉ. पंजाबराव देशमूख राष्ट्रीय शिक्षक परीषदेचे वर्धा जिल्हाध्यक्ष तसेच नवोपक्रमशील आणि ऑयडॉल शिक्षक प्रा. गिरीश काळे, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय वर्धा, यांनी लिहीलेले' साक्षरता गीत ' सर्वत्र गाजत आहे. सदर गीताच्या रचनेकरिता शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परीषद वर्धा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. प्रा.गिरीश काळे यांनी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत या साक्षरता गीताची रचना केलेली असून सदर गीताला प्रा.विकास काळे यांनी स्वरबध्द केले आहे तसेच सूप्रसिध्द गायिका डॉ.भैरवी काळे (मोहदूरे) यांच्या सूमधूर आवाजात हे गीत गायिलेले आहे. रेडिओ आकाशवाणी केंद्रातून सदर साक्षरता गीत सर्वत्र प्रसारीत होत आहे.याबद्दल त्यांचे मराठी विषय महासंघातर्फे विशेष असे कौतुक करण्यात येत असल्याचे महासंघाचे अध्यक्ष प्रा. सुनील दिसले (बारामती )व राज्य समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे (जालना) यांनी सांगितले आहे.

## प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांचा वाढदिवसानिमित्त जेईएस महाविद्यालयात गौरवपूर्ण सत्कार



**जालना (राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे मराठी विषय महासंघाचे राज्य समन्वयक प्रा डॉ राजेंद्र सोनवणे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ सुमंत बिककड, प्रा. ज्ञानेश्वर धनवे, एनसीसी अधिकारी डॉ फुलचंद मोहिते, प्रा समाधान पवार, प्रा सुग्रीव वासरे, प्रा परशुराम चौरे, डॉ स्वप्निल सारडा, डॉ. महाजन, प्रा सोनी, डॉ. बाबासाहेब वाघ, प्रा. जगदीश मुळे, प्रा संतोष मुंदडा, आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ एप्रिल २०२६


## आरोग्य - सामाजिक क्षेत्रातील संस्थांच्या सहकार्याने आरोग्य सेवा तळागाळात पोहोचणार -स्वानंद सोनार



**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये व स्वयंसेवी संघटनांनी एकत्रितपणे कार्य केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचू शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ. स्वानंद अरुण सोनार यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभाग्रहात आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील समन्वयासाठी आयोजित मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस मा.जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, डॉ.अजित विसपुते- उत्तर महाराष्ट्र विभागीय समन्वयक; युवराज महाजन, संस्था समन्वयक, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष बीड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.कागदे चैतन्य, राहुल चव्हाण व गणेश गिराम जिल्हा समन्वयक आणि जिल्ह्यातील जवळपास २५ स्वयंसेवी संस्था व प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ.सोनार म्हणाले, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष सर्व उपक्रमांना आवश्यक समन्वय व सहकार्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळवून देताना शासकीय निधीचा अपहार करणारे तथाकथित रुग्णसेवक तसेच अशा गैरप्रकारांना सहाय्य करणारी अथवा खोटी रूग्णप्रकरणे सादर करून शासकीय पैशाचा अपहार करणारी रुग्णालये, योजनेसह संलग्नता प्राप्त करून देण्यासाठी पैसे मागणारे मध्यस्थ या सर्वांवर कायदेशीर कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी कळविले, सोबतच मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत गेल्या वर्षभरात पुरवलेल्या सेवा, विशेष उपक्रम, व वितरीत निधी या संदर्भात संक्षिप्त आढावा देण्यात आला.जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी दरमहा सामुदायिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन रुग्णालयांनी करावे, त्यात सेवाभावी संस्थानी व्यापक स्वरूपात सहभागी व्हावे, कॅन्सर आरोग्य तपासणीचे प्रमाण वाढवण्यासाठी फिरत्या चिकित्सा पथकांचा वापर वाढवावा, असेही त्यांनी आवाहन केले.महिलांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण धोरण निश्चित करण्यात आले. महिला सक्षमीकरण, पोषण, आरोग्य जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत चर्चा झाली. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या आरोग्य समस्यांचा विचार करून त्यांच्यासाठी शुश्रूषा सेवा, निवारा केंद्रे स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला. या घटकांसाठी विशेष आरोग्य सुविधा निर्माण करण्यावर सर्व प्रतिनिधींनी एकमत दर्शवले. जिल्ह्यातील उसतोड कामगारांच्या आरोग्य विषयक प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली, तसेच उसतोड महिला, एकल महिला, घरकामगार महिला ईत्यादीसाठी विशेष प्रकल्प राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रशासन, रुग्णालये व स्वयंसेवी संस्थांनी मिळुन वाढत्या मानसिक आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.बैठकीदरम्यान 'निरामय बीड जिल्हा अभियान' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सादरीकरण व सविस्तर चर्चा सत्र करण्यात आले. या अभियानांतर्गत सर्वसमावेशक व आजार प्रतिबंधक आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यावर तज्ज्ञांनी मते व्यक्त केली. जिल्ह्याचा आरोग्य निर्देशांक उंचावण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण आरोग्याबाबत सविस्तर चर्चा झाली.गत काही वर्षापासून कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे, विशेषतः महिलांना होणाऱ्या कॅन्सरच्या प्रमाणात खूप वाढ झाली आहे, आणि त्याचा परिणाम पूर्ण कुटुंबाच्या स्वास्थ्यवरती पडत आहे. याच्या प्रमाणात घट करायची असेल तर प्राथमिक तपासणी करून लवकरात लवकर त्याचे निदान होणे आवश्यक आहे. यासाठी " निरामय बीड जिल्हा कृतीदल " डॉ.स्वानंद सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करून मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष बीड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.कागदे चैतन्य, श्री सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा अॅड भाग्यश्री ढाकणे; भगवंतकुमार फौंडेशनचे अध्यक्ष ज्योतिबा नन्नवरे; श्री ज्ञानेश्वर बहुद्देशीय सेवाभावी संस्थाचे सचिव भगवंत पाळवदे ; बबनराव माने (जय महाराष्ट्र उसतोड कामगार संघटना ) यांच्यावर या कृतीदलाच्या अंमलबजवणीची जबाबदारी देण्यात आली. या बैठकीस श्री ज्ञानेश्वर बहुद्देशीय सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून श्री भगवंत पाळवदे यांनी रुग्ण आणि हॉस्पिटल मध्ये समन्वयक म्हणून काम करू, तसेच ग्रामीण भागात तांडे, वाडी, वस्तीवर जाऊन जनजागृती, प्रचार, प्रसार, विविध कॅम्पचे आयोजन, लोक सहभागातून डोनेशन, विविध कॅम्प दरम्यान आर्थिक मदत, विविध वस्तू जमा करून देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

श्री सेवा भावी संस्थेच्या अध्यक्ष अॅड भाग्यश्री ढाकणे यांच्या वतीने बीड जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्य सुदृढ करण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन केल. या बैठकी बाबत श्री. शरद झोडगे, डॉ. भीमसिंग मिसाळ, डॉ. राहुल सारडा, डॉ. प्रशांत सानप,
डॉ. आशिष गरजे डॉ. विजयकुमार घोळवे, डॉ. प्रदीप शेळके यांनी आपापली मते मांडून समाधान व्यक्त केले व निरामय बीड जिल्हा उपक्रम यशस्वी करण्याचे मानस व्यक्त केले.

## अखंड हरिनाम सप्ताह व महाशिवपुराण कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणला सुरुवात



**अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जळकोट तालुक्यातील अतनूर येथील श्री.सदगुरू घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी १५० व्या. सजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त श्री.काशी विश्वनाथ महादेव मंदिर संस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण महाकथेला शुक्रवार दि.१७ एप्रिल रोजी धार्मिक वातावरणात ह.भ.प. परमेश्वर महाराज शहापूरकर यांच्या कीर्तनाने सुरुवात झाली.अतनूर येथे दि. १६ एप्रिल ते २२ एप्रिल पर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प.सौ. कान्होपात्राताई कुंडलवाडीकर महाशिवपुराण कथाकार यांचे कथा होईल. तसेच दि.१७ एप्रिल ते २४ एप्रिल या कालावधीत किर्तनकारांसह हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून परिसरात आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे. दैनंदिन भरगच्च कार्यक्रम या सप्ताहमध्ये दररोज पहाटे ६ ते ७ श्री. घाळेप्पा स्वामी महाराजांचा रुद्राभिषेक, ७ ते १० श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा वरील भजन, २ ते ५ महापुराण कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, ९ ते ११ हरिकिर्तन, रात्री १२ ते ४ हरिजागर, पहाटे ४ ते ६ काकडा आरती, दररोज दि. १७ एप्रिल रोजी रात्री ९ ते ११ ह.भ.प.श्री.परमेश्वर महाराज शहापूरकर यांच्यापासून सुरुवात होऊन दि. १७ एप्रिल ते २४ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्रातील नामावंत कीर्तनकाराची कीर्तन रंगणार आहेत. नंतर हरीजागर कीर्तन महोत्सवाला प्रमुख वक्ते सप्ताहात दररोज विविध मान्यवर कीर्तनकाराची सेवा लाभणार आहे. यात प्रामुख्याने १७ एप्रिल रोजी परमेश्वर महाराज, १८ एप्रिल रोजी ह.भ.प.कु. कांचनाताई शिवानंद शेळके आडमपूर, १९ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री.मधुकर महाराज सावळकर, २० एप्रिल रोजी ह.भ.प. सौ.कान्होपात्राताई कुंडलवाडीकर, २१ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री.बाळू महाराज गिरगावकर, २२ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री. कबीर महाराज आतार शिवव्याख्याते, २३ एप्रिल रोजी ह.भ.प.विश्वनाथ महाराज आतनुरकर, दुपारी तर दि.२३ एप्रिल रोजी संध्याकाळी ८:३० ते ११:३० वाजता ह.भ.प.चंद्रशेखर महाराज देगलूरकर, २४ एप्रिल रोजी ह.भ.प.श्री.पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे दुपारी काल्याचे किर्तन व सांगता होणार असून दुपारी दोन ते पाच या वेळेत दिव्य महाप्रसादाचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे. दि.२४ एप्रिल रोजी रात्री ८.३० ते ११.३० वाजता ह.भ.प.श्री.समाधान महाराज केजकर भागवताचार्य यांचे कीर्तन होणार आहे. या सोहळ्याला पंचकोशितील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आव्हान श्री.महादेव मंदीर टेम्पल मंदिराचे तसेच काशी विश्वनाथ संस्थान मंडळाचे पदाधिकारी व भजनी मंडळ व समस्त गावकरी मंडळी अतनूर यांच्या वतीने करण्यात आले.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ एप्रिल २०२६


# तूच सांग देवबाप्पा

तूच सांग देवबाप्पा
मी कसा वागू
न केलेल्या गुन्ह्याची
शिक्षा का भोगू ?

सतत अभ्यास केला की
दादा म्हणतो पुस्तकी किडा
टी.व्ही. जवळ बसता
बाबा म्हणतात परीक्षेत रडा

आजी नेहमी सांगते
सत्य असते महान
बस मधून प्रवास करतांना
आई वय सांगते लहान

सर्व म्हणतात लहान मुलात
देवाचे असते रूप
प्रसाद उष्टा केला की
कुणीच बसत नाही चूप

मोठ्यांचे वागने पाहून
मनाला जातो तडा
तूच शिकव देवबाप्पा
मोठ्यांना चांगला धडा




- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106



प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


# समतेचे मार्गदर्शक महात्मा बसवेश्वर

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनाचे जे दीपस्तंभ उभे राहिले, त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत उंच व प्रेरणादायी आहे. बाराव्या शतकातील हा महान समाजसुधारक केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारा होता. आज साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांची पुनर्स्मृती आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता अधोरेखित करण्याची संधी आहे. समता, बंधुता, श्रमाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धाविरोध या मूल्यांचा पाया त्यांनी घातला, जो आजच्या आधुनिक लोकशाही भारताच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यातील विचारशीलता, तर्कशक्ती आणि अन्यायाविरुद्धचा विरोध स्पष्ट दिसून येत होता. त्या काळात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कडवट स्वरूपात अस्तित्वात होती. उच्च-नीचतेच्या भेदामुळे समाजात अन्याय, शोषण आणि असमानता वाढत होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडांनी सामान्य जनतेचे जीवन अधिकच कठीण केले होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीचा ध्यास घेतला आणि समाजाला नव्या विचारांची दिशा दिली.बसवेश्वरांनी श्रम हाच सर्वोच्च धर्म आहे असे मानले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वावर आधारित जीवन जगावे, असा संदेश दिला. त्यांच्या या विचारामुळे समाजातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान प्राप्त झाला. त्या काळात श्रमाला कनिष्ठ मानले जात असताना बसवेश्वरांनी श्रमाचे गौरवगान करून सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते, आणि त्याची मुळे बसवेश्वरांच्या विचारांत दिसून येतात.बसवेश्वरांनी स्थापना केलेल्या संस्थेच्या मंचावर सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर चर्चा करत असत. विशेष म्हणजे या मंचावर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आली होती. त्या काळात स्त्रियांचे स्थान अत्यंत दुय्यम मानले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले. हे त्यांच्या प्रगतिशील आणि लोकशाही विचारांचे द्योतक आहे. संस्थेमध्ये केवळ धार्मिक चर्चा होत नसून सामाजिक समस्यांवरही उपाय शोधले जात होते, ज्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले.बसवेश्वरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे तर त्याच्या कर्मावरून ठरते. त्यांनी सर्वांना समान मानले आणि समाजात भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमुळे अनेकांनी जातीभेदाचा त्याग करून समतेच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, जे त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली, परंतु त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.स्त्री-पुरुष समानतेबाबत बसवेश्वरांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान अधिकार देण्यावर भर दिला. त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्या काळात स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या स्थानात सकारात्मक बदल घडून आला.बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बाह्य आडंबर यांचा तीव्र निषेध केला. त्यांनी साधेपणावर भर दिला आणि अंतर्मुख भक्तीची संकल्पना मांडली. त्यांच्या वचनांमधून त्यांनी लोकांना सत्य, नैतिकता आणि साधेपणाचा मार्ग दाखवला. त्यांनी देवाची उपासना ही मनापासून करावी, असे सांगितले आणि बाह्य विधींचा त्याग करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विचारांमुळे धर्माचा खरा अर्थ लोकांना समजला.बसवेश्वरांच्या वचनांमध्ये समाजातील वास्तवाचे चित्रण दिसून येते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनातील अनुभव, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा समन्वय आहे. त्यांनी सोप्या भाषेत आणि प्रभावी शैलीत आपले विचार मांडले, ज्यामुळे ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या वचनांमधून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञान यावर प्रहार केला आणि लोकांना जागृत केले.आजच्या काळात बसवेश्वरांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. आधुनिक भारतात जरी संविधानाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांची हमी दिली असली तरी समाजात अजूनही अनेक प्रकारचे भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. जातीयवाद, लिंगभेद, आर्थिक विषमता आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या अजूनही समाजाला ग्रासून आहेत. अशा परिस्थितीत बसवेश्वरांचे विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.शिक्षणाच्या क्षेत्रातही बसवेश्वरांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. आजच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. बसवेश्वरांनी दिलेले नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण आजच्या पिढीला देणे आवश्यक आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.आर्थिक क्षेत्रात बसवेश्वरांनी श्रमाच्या आधारे संपत्ती निर्माण करण्यावर भर दिला. त्यांनी परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले आणि परजीवी वृत्तीचा निषेध केला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांच्या या विचारांची उपयुक्तता कमी झालेली नाही. स्वावलंबन, कष्ट आणि प्रामाणिकपणा यांवर आधारित अर्थव्यवस्था समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.बसवेश्वरांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव पुढील अनेक शतकांपर्यंत दिसून येतो. त्यांच्या विचारांमुळे समाजात समतेची जाणीव निर्माण झाली आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. त्यांच्या कार्याने अनेक समाजसुधारकांना प्रेरणा दिली आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ पुढे नेली.आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे.महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत.अखेरीस असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.




डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.